# कंत्राटी पदभरती जाहीरात

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

## जिल्हा आरोग्य सोसायटी, सातारा, महाराष्ट्र

जिल्हा आरोग्य सोसायटी, जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत.

| अ.क्र | पदाचे नाव | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | वय | शैक्षणिक अर्हता | अनुभव | प्रवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकिय अधिकारी पुर्ण वेळ १<br>अर्बन RCH वैद्यकिय अधिकारी पुर्णवेळ १ | २ | नागरी आरोग्य केंद्र सातारा २ | खुला 38, राखीव 43, NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्षे | MBBS | | अ.जा. ०१<br>इ.मा.व. ०१ | रु.४५०००/- |
| 2 | वैद्यकिय अधिकारी अर्ध वेळ | २ | नागरी आरोग्य केंद्र सातारा १<br>फलटण १ | खुला 38, राखीव 43, NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्षे | MBBS | | लागु नाही | रु.२८०००/- |
| 3 | स्टाफ नर्स | ६ | नागरी आरोग्य केंद्र सातारा ४<br>कराड २ | खुला 38, राखीव 43, NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल, निवृत्त शासकीय कर्मचारी ६५ वर्षे | RGNM Course, B.Sc Nursing, MNC Reg | प्राधान्य राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत शैक्षणिक कर्ज घेतलेले उमेदवार | अ.ज.:-१<br>वि.जा.अ.:-१<br>इ.मा.व.:-१<br>एसईबीसी:-१<br>खुला:-२ | रु.१२०००/- |
| 4 | औषध निर्माता | १ | नागरी आरोग्य केंद्र फलटण १ | खुला 38, राखीव 43, NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल, निवृत्त शासकीय कर्मचारी ६५ वर्षे | B-Pharm/D-Pharm | | एसईबीसी:-१ | रु.१००००/- |
| 5 | एलएचव्ही | २ | नागरी आरोग्य केंद्र सातारा २ | खुला 38, राखीव 43, NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल, निवृत्त शासकीय कर्मचारी ६५ वर्षे | RGNM Course, B.Sc Nursing, MNC Reg | प्राधान्य राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत शैक्षणिक कर्ज घेतलेले उमेदवार | अ.जा. ०१<br>इ.मा.व. ०१ | रु.१०८००/- |

अटी व शर्ती:-

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती दि. ०५.०१.२०२० पर्यंत राहील.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. सदरची कंत्राटी पदे ही सातारा, कराड व फलटण येथील नगर पालीका अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रातील आहेत.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) सेवानिवृत्त विशेषतज्ञ/कर्मचारी यांचे निवड झालेस सदर पदांकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सातारा यांनी राखून ठेवले आहेत.

७) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

८) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

९) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत, पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

१०) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

११) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद् करण्यात येईल.

१२) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील.

१३) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

१४) शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१५) विशेषतज्ञ/कर्मचारी या पदांकरीता शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी या पदांकरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवते रुजु झालेचा दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्ती झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन), याबाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

१६) वैद्यकिय अधिकारी पदासाठी सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष कर्मचारी यांचेसाठी ६५ वर्ष कमाल मर्यादा राहील. तसेच शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१७) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळण्याचे मागणी करता येणार नाही.

१८) उपरोक्त पदापैकी तांत्रिक पदांकरीता, एलएचव्ही, स्टाफ नर्स, औषध निर्माता, वैद्यकिय अधिकारी ई. पदांकरीता तत्सम कौन्सिलकडुन रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

१९) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

२०) मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही. तसेच एक कोरा लिफाफा ज्यावर रु.५/- टपाल तिकीट लावुन स्वतःचे नाव व पत्ता प्रती या ठिकाणी लिहुन अर्जासोबत जोडावा.

२१) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह आपले अर्ज तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, सातारा, तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, कराड व तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, फलटण येथे दि. २६/०७/२०१९ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत व्यक्तीशः सादर करावेत.

२२) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील

२३) सदरहु भरतीप्रक्रियेकरीता अर्ज २७.०७.२०१९ अखेर राहणार असुन तदनंतर अर्जाची छाननी, लेखी परिक्षा/मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ.बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी सातारा जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर www.zpsatara.gov.in तसेच सातारा जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाणार नाही. त्याकरीता उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियान सातारा कार्यालयाकडील ०२१६२-२३५९४८ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधु शकतात.

❖ खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका  २) जातीचे प्रमाणपत्र  ३) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला

४) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे  ५) पासपोर्ट आकाराचे २ फोटो  ६) शासकीय अनुभव असलेस अनुभव दाखला

| सही | सही | सही |
|---|---|---|
| सदस्य सचिव | सदस्य | अध्यक्ष निवड समिती |
| तालुका आरोग्य अधिकारी | जिल्हा आरोग्य अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ............................ | जिल्हा परिषद सातारा | जिल्हा परिषद सातारा |

अर्जाचा नमुना

............................या पदासाठी अर्ज

पासपोर्ट आकाराचा
उमेदवाराचा
नजिकचा साक्षांकीत
फोटो

प्रती,
मा. तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती...............

१) संपुर्ण नाव    मराठी    इंग्रजी (कॅपीटल लेटर)

१) आडनाव    .......................    .............................

२) स्वतःचे नाव    .......................    .............................

३) वडीलांचे/पतीचे नाव ...................... ............................

४) आईचे नाव ...................... ............................

१) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता

पिनकोडसहीत.............................................................................

२) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक..................................................................

३) जन्मतारीखः- दि.०१.०७.२०१९ रोजीचे वय :- .....वर्षे........दिवस

५) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याप्रमाणे चौकटीमध्ये ☐अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज. (ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एसईबीसी | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

६) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७) अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | |
| | | | |

८) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय? असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

| होय | नाही |
|---|---|
| | |

९) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) ..................................

२) ..................................

३) ..................................

१०) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे? काय होय/नाही

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद् करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

सही/-

नाव.................